
बुलडाणा ◆ वर्ष - १ ◆ अंक - ३० ◆ पृष्ठे - ४ ◆ RNI No . MHBIL/25/A1435 ◆ batamijagata@gmail. com ◆ मुख्य संपादक : कैलास हरीभाऊ राऊत - 9561596693 ◆ मानद संपादक : गणेश निकम केळवदकर - 9403478540

दैनिक रविवार ३० नोव्हेंबर २०२५

# बातमी जगत

आवाज जनसामान्यांच्या हक्काचा

TRENDING NEWS



पान मसाला जाहिरात वादावर सलमानचे उत्तर:कोर्टात म्हणाले– मी गुटखा नाही, फक्त इलायचीला प्रमोट करतो

पान 3 वर

# नगर परिषदांसाठी 20 डिसेंबर रोजी मतदान

## आरक्षणाविषयी नव्हे, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांविरुद्ध दाखल होते अपील

बातमी जगत | प्रतिनिधी





**मुंबई** : आरक्षणाविषयी नव्हे, तर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या विविध आदेशांविरुद्ध काही ठिकाणी उमेदवारांनी न्यायालयात अपील दाखल केले होते. अशा ठिकाणच्या नगर परिषद, नगरपंचायतींतील अपील केलेल्यांच्या वॉर्ड किंवा नगराध्यक्षपदासाठी २० डिसेंबरला मतदान आणि २१ डिसेंबरला मतमोजणी होणार आहे.

या संदर्भात राज्य निवडणूक आयोगाने २९ नोव्हेंबर रोजी जारी केलेल्या आदेशपत्रात म्हटले आहे की, न्यायालयीन अपील दाखल झालेल्या व नियमबाह्य कार्यवाहीमुळे प्रभावित झालेल्या राज्यातील नगर परिषदा आणि नगरपंचायतींसाठी सुधारित सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम २०२५ जाहीर केला आहे. त्यानुसार अपिलांमुळे थांबलेल्या क्षेत्रांतील निवडणूक प्रक्रिया तात्काळ स्थगित करण्यात आली असून जिल्हाधिकाऱ्यांना नियमानुसार पुढील टप्पे पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आयोगाने म्हटले आहे की, राज्यातील २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींसाठी पूर्वी ४ नोव्हेंबर रोजी निवडणूक कार्यक्रम देण्यात आ ला होता. मात्र, नामनिर्देशनपत्रांची छाननी झाल्यानंतर निवडणूक निर्ण य अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरोधात दाखल झालेल्या अपीलांचे निकाल २२ नोव्हेंबर २०२५ नंतर, म्हणजेच २३ नोव्हेंबर २०२५ किंवा तद्नंतर लागले. म्हणून निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम-१९६६ मधील नियम १७ (१) (ब) नुसार उमेदवारांना नामनिर्देशनपत्र माघारीसाठी आवश्यक असलेला तीन दिवसांचा कालावधी न देताच निवडणूक चिन्ह वाटप केले. आयोगाच्या मते, ही चिन्ह वाटपाची कार्यवाही नियमबाह्य ठरते. ज्या नगरपरिषदा व नगरपंचायतींमध्ये अपिलाचा निकाल २३ नोव्हेंबर २०२५ किंवा त्यानंतर देण्यात आला. तेथील केवळ संबंधित सदस्यपदाची तसेच अध्यक्षपदाचा समावेश असल्यास त्या संपूर्ण नगरपरिषदेची, नगरपंचायतीची निवडणूक स्थगित केली आहे. जिल्हाधिकाऱ्यांना तातडीचे आदेश राज्य निवडणूक आयोगाने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना आदेश दिले आहेत की, आपल्या जिल्ह्यातील अशा प्रकरणांची तातडीने माहिती संकलित करावी. ज्या ठिकाणी २३ नोव्हेंबरनंतर न्यायालयाचे आदेश आले आहेत, तिथली निवडणूक प्रक्रिया थांबवून नव्याने सुधारित कार्यक्रम राबवावा. यासाठी आयोगाने सुधारित वेळापत्रक (परिशिष्ट-1) जारी केले असून जिल्हाधिकाऱ्यांनी अशा जागांची यादी आयोगाला विनाविलंब सादर करायची आहे.

### कुठल्या निवडणुका स्थगित होणार?

- **आयोगाच्या आदेशानुसार खालील दोन प्रकारच्या निवडणुका स्थगित करण्यात आल्या आहेत. 1. सदस्य पद : ज्या वॉर्डमध्ये किंवा जागेसाठी अपील दाखल होते आणि त्याचा निकाल २३ नोव्हेंबर 2025 किंवा त्यानंतर आला आहे, फक्त त्या विशिष्ट जागेची निवडणूक स्थगित करण्यात आली आहे. 2. अध्यक्ष पद : जर अपीलाचा विषय अध्यक्षपदाशी संबंधित असेल आणि तिथे उशिरा निकाल लागला असेल, तर त्या संपूर्ण नगरपरिषद किंवा नगरपंचायतीची निवडणूक स्थगित करण्यात आली आहे.**

### सुधारित निवडणूक वेळापत्रक असे

**१.** जिल्हाधिकारी निवडणूक कार्यक्रम जारी करणार
- ४ डिसेंबर २०२५

**२.** उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख
- १० डिसेंबर २०२५, दुपारी ३ वाजेपर्यंत

**३.** निवडणूक चिन्ह नेमून देणे व अंतिम यादी प्रसिद्धीची तारीख
- ११ डिसेंबर २०२५

**४.** संभाव्य मतदान
- २० डिसेंबर, मतमोजणी - २१ डिसेंबर २०२५

## थोडक्यात

### बँकेसमोरून रोकड लंपास

**दारव्हा :** शहरातील बुलढाणा अर्बन बँकेसमोर उभ्या असलेल्या स्कुटीची डिक्की तोडून, अज्ञात चोरट्याने त्यातील १ लाख ९० हजार रुपयांची रोकड लंपास केल्याची खळबळजनक घटना घडली. २८ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजताच्या सुमारास ही चोरी झाली. रघुनाथ देवराव कोळपे (६७, रा. कविता नगर) हे बँकेच्या कामासाठी आले होते. त्यांनी आपल्या एमएच-२९ बीके २५४० क्रमांकाच्या स्कुटीच्या डिक्कीत १ लाख ९० हजार रुपये ठेवले होते. अज्ञात चोरट्याने संधी साधून डिक्की तोडली आणि पैशांवर डल्ला मारला. पैसे चोरीला गेल्याचे लक्षात येताच कोळपे यांनी दारव्हा पोलीस ठाणे गाठले. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अन्वये चोरीचा गुन्हा (क्र. ७०८/२५) दाखल केला आहे. भरदिवसा बँकेसमोरून पैसे चोरीला गेल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून, पोलीस सीसीटीव्हीच्या आधारे तपास करत आहेत.

### दारव्हातील जलाराम नगरात घरफोडी

**दारव्हा :** शहरातील जलाराम नगर भागात एका बंद घराचे कुलूप तोडून, चोरट्यांनी तब्बल २ लाख ७० हजार ५०० रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने लंपास केले. ही घटना २७ नोव्हेंबरच्या रात्री ते २८ नोव्हेंबरच्या सकाळदरम्यान घडली. काजल सुरज पाटील (२७, रा. जलाराम नगर) या काही कामानिमित्त घराबाहेर गेल्या होत्या. हीच संधी साधून अज्ञात चोरट्याने त्यांच्या घराच्या दरवाजाचा कडी-कोंडा तोडून आत प्रवेश केला. चोरट्यांनी घरातील लोखंडी कपाट फोडून त्यातील सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेले. २८ नोव्हेंबर रोजी सकाळी ही घटना उघडकीस आली. याप्रकरणी काजल पाटील यांनी दिलेल्या तक्रारीवरून, दारव्हा पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३३१(४), ३०५ अन्वये घरफोडीचा गुन्हा (क्र. ७०९/२५) नोंदवला आहे. पोलीस पुढील तपास करत आहेत.

### महिलेचे दागिने लंपास

**दिग्रस :** दिग्रस बस स्थानकावर बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेऊन, एका अज्ञात महिला चोरट्याने ५० वर्षीय महिलेच्या गळ्यातील ७७ हजार रुपयांचे दागिने चोरल्याची घटना २४ नोव्हेंबर रोजी घडली. सौ. प्रमीला महादेव तायडे (५०, रा. शहापूर, ता. मंगरुळपीर) या तुपटाकळी येथून मंगरुळपीरला जाण्यासाठी दिग्रस बस स्थानकावर आल्या होत्या. दुपारी १२:४५ वाजताच्या सुमारास बसमध्ये चढताना गर्दी झाली. याच वेळी अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील १०.३८० ग्रॅम वजनाची सोन्याची मिनी पोत (किंमत ६०,२०० रुपये) आणि ३.०२० ग्रॅमचे डोले (किंमत १७,५१६ रुपये) असे एकूण ७७,७१६ रुपयांचे दागिने चोरले. याप्रकरणी उशिराने, म्हणजेच २८ नोव्हेंबर रोजी दिग्रस पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली. पोलिसांनी चोरीचा गुन्हा (क्र. ८४६/२५) नोंदवला असून, पोलीस तपास करत आहेत.

## राष्ट्रवादीच्या उमेदवारावर तरुणाने उधळल्या नोटा: निवडणूक आयोग काय कारवाई करणार?

बातमी जगत | प्रतिनिधी



**नागपूर** : उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवाराच्या अंगावर एका तरुणाने नोटा उधळल्याची घटना नागपूरच्या कामठीत घडली आहे. यासंबंधीचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. त्यात संबंधित उमेदवार नोटा उधळणाऱ्या तरुणाला आपुलकीने जवळ घेत असल्याचे दिसून येत आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या प्रचाराचा फड अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. त्यात सर्वच उमेदवार मतदारांची मने जिंकून त्यांची मते आपल्याकडे वळवण्याचा प्रयत्न करत आहेत. या पार्श्वभूमीवर नागपूरच्या कामठी येथे वरील घटना घडली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार शाहजहाँ शफावत अन्सारी हे कामठी नगरपरिषदेच्या निवडणुकीत नगराध्यक्षपदाचे उमेदवार आहेत. त्यांची शुक्रवारी रात्री सभा झाली. या सभेत ते भाषण देत असताना एका तरुणाने अचानक त्यांच्याकडे जात त्यांच्या अंगावर नोटा उधळल्या.

## एका झाडाच्या बदल्यात 15 हजार झाडे लावणार:राईचा पर्वत करू नका, मंत्री गिरीश महाजनांचे प्रत्युत्तर

बातमी जगत | प्रतिनिधी



**मुंबई** : आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकमधील तपोवन परिसरात साधूग्राम उभारणीसाठी प्रस्तावित असलेल्या वृक्षतोडीचा मुद्दा चांगलाच तापला आहे. यावरून पर्यावरणप्रेमी आणि अभिनेते सयाजी शिंदे यांनी आक्रमक पवित्रा घेतला असतानाच, आता यावर राज्याचे मंत्री आणि कुंभमेळा कामांचे प्रभारी गिरीश महाजन यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे. "आम्ही सरसकट झाडे तोडत नाही, तर एका झाडाच्या बदल्यात दहा झाडे लावणार आहोत. त्यामुळे या विषयाचा उगीच राईचा पर्वत करू नका," असे आवाहन महाजन यांनी केले आहे.

सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी तपोवन भागात साधूग्राम उभारले जाणार आहे. ही जागा साधूग्रामसाठी आरक्षित असली तरी तिथे सध्या अनेक झाडे आहेत. ही झाडे तोडण्यास वृक्षप्रेमींनी आणि मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी विरोध दर्शवला होता. अभिनेते सयाजी शिंदे यांनीही यावर संताप व्यक्त करत, "गिरीश महाजन तुम्ही जबाबदार माणूस आहात, उत्तर द्या. आपली काही दुश्मनी नाही, पण झाडे तुटता कामा नयेत," असे म्हटले होते. सयाजी शिंदे यांच्या मागणीनंतर आता गिरीश महाजन यांनी प्रतिक्रिया दिली आहे. "तपोवनातील ही जागा साधूग्रामसाठी आरक्षित आहे. कुंभमेळा 12 वर्षांतून एकदा येतो. ही जागा आम्ही कोणाच्या घशात घालत नाही किंवा तिथे झाडे तोडून रेस्टॉरंट बांधणार नाही. त्यामुळे या विषयाचा बाऊ करू नये. सरकार वृक्षतोडीच्या बाजूने नाही, आम्ही सुद्धा वृक्षप्रेमीच आहोत," असे प्रत्युत्तर गिरीश महाजन यांनी राज ठाकरेंच्या प्रश्नाला दिले. "काही झाडे काढावी लागणार आहेत, हे सत्य आहे. मात्र, आम्ही 1 हजार झाडे काढणार असू तर त्या बदल्यात १५ हजार झाडे लावणार आहोत. हैदराबादवरून ही झाडे आणली जाणार आहेत. झाडे लावण्याचे काम आधी सुरू झाले आहे. आम्ही लावणार असलेल्या झाडांमुळे उलट जंगल वाढणार आहे," असेही गिरीश महाजन यांनी म्हटले आहे. अभिनेते सयाजी शिंदे यांच्या टीकेला उत्तर देताना महाजन यांनी समजूतदारपणाची भूमिका घेतली. ते म्हणाले, "सयाजी शिंदे यांचे समाधान झाल्यानंतर आम्ही झाडे लावू. आम्ही असे म्हणत नाही आहोत, की आम्ही लावून टाकू, करून टाकू, आम्ही आधी लावू मग तुम्ही आम्हाला सांगा, काय करायचे?"

## वाल्मीक कराड फासावर चढेपर्यंत स्वस्थ बसणार नाही:शरद पवार गटाच्या आमदाराचा निर्धार

बातमी जगत | प्रतिनिधी



**बीड** : संतोष देशमुख हत्या प्रकरणात माजी मंत्री धनंजय मुंडे यांचा सहकारी वाल्मीक कराड याला फासावर लटकवेपर्यंत मी स्वस्थ बसणार नाही, असा निर्धार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी केला आहे. यावेळी त्यांनी या प्रकरणातील एक फरार आरोपी कृष्णा आंधळे हा जिवंत असण्यावरही शंका व्यक्त केली. आमदार रोहित पवार यांनीही संतोष देशमुख हत्याकांडात अद्याप न्याय झाला नसल्याची खंत व्यक्त केली आहे.

संपूर्ण महाराष्ट्राला हादरवणाऱ्या संतोष देशमुख हत्याकांडाला आज 29 नोव्हेंबर रोजी बरोबर 1 वर्ष पूर्ण झाले. पण आजही देशमुख कुटुंबीय व मस्साजोगच्या ग्रामस्थांचा न्यायाचा लढा संपला नाही. देशमुख कुटुंबीयांनी संतोष यांच्या स्मरणार्थ आज मस्साजोग येथे कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. त्याला मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार अंबादास दानवे, राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे खासदार बजरंग सोनवणे, आमदार संदीप क्षीरसागर यांच्यासह अनेक छोटे - मोठे नेते उपस्थित राहणार आहेत. वाल्मीकला फासावर चढवणार म्हणजे चढवणार या पार्श्वभूमीवर आमदार संदीप क्षीरसागर यांनी वाल्मीक कराडला फासावर लटकवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मीक कराडला फाशी होईपर्यंत मी स्वस्थ बसणार नाही. आम्ही सुरुवातीलासूनच वाल्मीक कराडचा सीडीआर काढण्याची मागणी करत आहोत. सीडीआर काढल्यास त्याला या प्रकरणात कुणी कुणी मदत केली हे स्पष्ट होईल. आजही देशमुख कुटुंबीयांच्या डोळ्यांत अश्रू आहेत. ते पाहून सर्वांना वाईट वाटते. आम्ही प्रस्तुत प्रकरणात सुरुवातीपासूनच देशमुख कुटुंबीयांच्या पाठिशी आहोत, असे ते म्हणाले.

## भक्ती विकून प्रॉफिट कमवणाऱ्या सत्ताधाऱ्यांना तपोवनाचं महत्व कसं समजेल?

बातमी जगत | प्रतिनिधी



**मुंबई** : भ्रष्टाचार हीच भक्ती आणि सत्ता हीच श्रद्धा असणाऱ्या सत्ताधाऱ्यांना तपोवनाचं महत्व काय कळणार? नगरपालिका बिनविरोध केली म्हणजे प्रॉफिट कमवण्यासाठी त्याच पद्धतीने तपोवन खाली करता येईल हा कोणाचा समज असेल तर हा तथाकथित संकटमोचकांचा गोड गैरसमज आहे, असे म्हणत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी भाजपचे मंत्री गिरीश महाजन यांच्यावर निशाणा साधला आहे.

तपोवनात साधूग्रामसाठी 1800 वृक्षतोडीची तयारी महापालिकेने केल्याने पर्यावरणप्रेमी, वृक्षप्रेमींनी आंदोलन उभे केले आहे. यावर मात्र शुक्रवारी (दि. 28) महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांनी येथील एकही झाड तोडले जाणार नसून केवळ 5 ते 7 वर्षांत वाढलेली झुडपे काढली जाणार असल्याचे विधान करतानाच काही लोक दिशाभूल करत असल्याचेही व्यक्त केले. यावरुन रोहित पवारांनी टीका करत मंत्री गिरीश महाजन यांना टार्गेट केले आहे.

रोहित पवारांनी X वर पोस्ट करत म्हटलंय की, भ्रष्टाचार हीच भक्ती आणि सत्ता हीच श्रद्धा असणाऱ्या सत्ताधाऱ्यांना तपोवनाचं महत्व काय कळणार? सत्ताधाऱ्यांना विशेषतः नाशिकच्या कारभाऱ्यांना केवळ आणि केवळ प्रॉफिटची भाषा कळते. कुंभमेळ्याच्या नावाखाली जमीन मोकळी करायची आणि कुंभमेळा संपताच एखाद्या संस्थेच्या नावाने जमीन लीजवर घेऊन लाटायची हाच सत्ताधाऱ्यांचा खरा डाव असून तपोवनाची जमीन लाटण्यासाठीच एवढा अट्टहास सुरु आहे.

## दे.राजा ; उमेदवार व प्रतिनिधींची महत्वाची पूर्वमतदान बैठक संपन्न; आचारसंहिता, एजंट नियुक्ती व EVM सिलींग प्रक्रियेवर मार्गदर्शन!

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ राजेश पंडित



**दे. राजा** : दे.राजा नगरपरिषद देऊळगाव राजा सार्वत्रिक निवडणूक 2025 च्या पारदर्शक, शांततापूर्ण व निर्भेळ पार पाडण्यासाठी आज दिनांक 29 नोव्हेंबर 2025 रोजी उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींची महत्त्वपूर्ण बैठक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या दालनात पार पडली. बैठकीचे अध्यक्षस्थान निवडणूक निर्णय अधिकारी श्री. सुरेश थोरात यांनी भूषवले.या बैठकीत निवडणूक आयोगाने दिलेल्या नियम, अटी, आचारसंहिता व तांत्रिक प्रक्रिया याबाबत सखोल माहिती उमेदवारांना देण्यात आली. विशेषत: मतदान दिनांक जवळ आल्याने निवडणुकीदरम्यानचे प्रत्येक नियम काटेकोरपणे पाळले जावेत यावर भर देण्यात आला.बैठकीतील प्रमुख मुद्दे — सविस्तर चर्चा प्रचारादरम्यान वाहनावरील भोंग्याचा आवाज प्रचारासाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनांवरील ध्वनिवर्धकांच्या वापराची वेळ, परवानगी प्रक्रिया व आवाजाची मर्यादा याबाबत स्पष्ट मार्गदर्शन. नियमांचे उल्लंघन झाल्यास कायदेशीर कारवाई अनिवार्य राहील, असे निर्देश.

निवडणूक प्रतिनिधी नेमणूक प्रत्येक उमेदवाराने निर्धारित नमुन्यात निवडणूक प्रतिनिधीची नेमणूक करून त्यांच्या नावांची नोंद ठरलेल्या वेळेत निर्णय अधिकाऱ्याकडे सादर करावी. प्रतिनिधींच्या जबाबदाऱ्या, अधिकार आणि मर्यादा यावर मार्गदर्शन.मतदान प्रतिनिधी (Polling Agent) नेमणूक मतदान प्रक्रियेतील पारदर्शकता जपण्यासाठी ची नियमानुसार नेमणूक आवश्यक.मतदान सुरू होण्यापूर्वी प्रतिनिधींची मतदान केंद्रावर अनिवार्य उपस्थिती राहील. निर्धारित स्वरूपात माहिती सादर करण्याचे निर्देश.

मतमोजणी प्रतिनिधी नेमणूक मतमोजणी दिवशी अधिकृत प्रतिनिधींची नावे वेळेत मतमोजणी केंद्राला कळवणे अनिवार्य. मतमोजणी केंद्रातील सुरक्षा, प्रवेशाची मर्यादा, शिस्त आणि आचारसंहितेबाबत तपशीलवार माहिती. EVM सिलींग प्रक्रिया EVM (BU, CU) सिलींगची संपूर्ण पद्धत उमेदवारांना समजावून सांगितली. सिलींगवेळी उमेदवार किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहणे आवश्यक. mock poll, प्रात्यक्षिक मतदान, सील क्रमांक पडताळणी व पारदर्शक पद्धतीने प्रक्रिया पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश. बैठकीदरम्यान उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींनी विविध शंका उपस्थित केल्या. निवडणूक विभागाने सर्व प्रश्नांचे समाधानकारक निरसन करून निवडणूक प्रक्रिया कठोर, पारदर्शक आणि कायदेशीर चौकटीत राहील याची खात्री व्यक्त केली.कार्यक्रमातील प्रमुख उपस्थिती सहायक निवडणूक निर्णय अधिकारी : श्रीमती सुप्रिया चव्हाण अतिरिक्त सहायक निवडणूक निर्णय अधिकारी : सौ. वैशाली डोंगरजाळे पोलीस निरीक्षक : ब्रम्ह गिरी निवडणूक शाखेचे अधिकारी व कर्मचारी नगरपरिषद देऊळगाव राजा – सार्वत्रिक निवडणूक 2025 ही बैठक यशस्वीरीत्या पार पडल्याने आगामी निवडणूक प्रक्रिया अधिक शिस्तबद्ध, सुरक्षित आणि पारदर्शकतेने पार पडणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## घटना -घडामोडी

### मूल्य शिक्षण......काळाजी गरज

नुकतेच संपूर्ण महाराष्ट्रभर मूल्यवर्धन 3.O हे एक शैक्षणिक प्रशिक्षण घेण्यात आले.या प्रशिक्षणात शिक्षकांना राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा 2023 च्या मार्गदर्शक तत्त्वानुसार विद्यार्थ्यांना नैतिक, सामाजिक मूल्य शिकवण्यासाठी तयार केले आहे.या प्रशिक्षणाचा उद्देश विद्यार्थ्यांना जबाबदार आणि सक्षम नागरिक बनवणे आहे. नेमकेहेमूल्यवर्धनशिक्षणम्हणजेकाय ?आणियाचीखरचगरजआहेकाय ? आधुनिक जगात तांत्रिक प्रगती आणि आर्थिक स्पर्धा जीवनाच्या प्रत्येक पैलूवर वर्चस्व गाजवत आहे.आजची मुलं सगळं शिकत आहेत .फिजिक्स, बायोलॉजी, केमिस्ट्री, गणित ,इंजिनिअरिंग, मेडिसिन ,संगणक...... शिक्षणावर मेहनत ही खूप घेत आहेत. परंतु शैक्षणिक शिक्षण आणि करियर मधील यशावर लक्ष केंद्रित करता करता आजच्या पिढीला नैतिक मूल्यांचा अक्षरश: विसर पडलेला आहे.दिल्ली बॉम्बस्फोटानंतर अनेक डॉक्टर आणि अभियंते दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी आहेत, असे लक्षात आले.त्याचबरोबर हृदय पिळवटून टाकणारी मालेगाव येथील बलात्काराची घटना..., उच्चशिक्षित मुलगी उच्चशिक्षित घरात दिली तरीही वाढणारे आत्महत्येचे प्रमाण, त्याचबरोबर व्यसनाच्या आहारी गेलेले अनेक मुले मुली.. अशी अनेक उदाहरणे सांगता येतील.मन कसं सांभाळायचे, तान कसा हाताळायचा, नातं कस टिकवायचं ,वेदना कशी पेलायची याचं शिक्षणच नाही.आणि त्यामुळे समाजामध्ये भ्रष्टाचार, बेईमानी, असहिष्णुता आणि मानवी हक्कांचा अनादर यासारख्या घटना वाढत आहेत.सांस्कृतिक ,धार्मिक आणि राजकीय फरकांमुळे जो संघर्ष उद्भवत आहे ,त्यासाठी जगाला अशा शिक्षणाची नितांत गरज आहे. जे केवळ शिक्षितच नाही तर मजबूत, नैतिक तत्त्वांनी परिपूर्ण असेल. शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान नव्हे तर मूल्य जोपासणे हेच खरे शिक्षण ,चारित्र्य घडवणे हेच खरे शिक्षण...आणि म्हणूनच मूल्यवर्धन 3.O हा कार्यक्रम 36 जिल्ह्यांमध्ये राबवण्यात आला आहे .शिक्षकांमार्फत मुलांमध्ये भारतीय संविधानातील लोकशाही, समानता, न्याय, स्वातंत्र्य ,धर्मनिरपेक्षता, मानवी प्रतिष्ठा आणि मूलभूत हक्कांचा आदर यासारखे मूल्य रुजवण्यात येणार आहेत.ज्यामुळे मुलांचा सामाजिक, भावनिक आणि नैतिक विकास साधता येणार आहे. शाळेमध्ये मूल्य शिक्षण देणे ही काळाची गरज आहे आणि शासनाने हे ओळखून शिक्षकांना प्रशिक्षित करण्याचा जो निर्णय घेतला तो खरच कौतुकास्पद आहे.

*ज्ञानाचा प्रकाश देण्या.....*
*दिवा अखंड तो जळतो,*
*जीवनाचा खरा अर्थ......*
*शिक्षकांमुळेच कळतो.*

या पंक्तीप्रमाणे प्रत्येक मूल हे शिक्षकांना आपला आदर्श मानत असतो. त्यामुळे प्रत्येक शिक्षकाने संविधानातील नैतिक मूल्ये अंगीकारली आणि त्याप्रमाणे विद्यार्थ्यांनाही विविध उपक्रमांच्या माध्यमातून ह्या मूल्यांचे शिक्षण दिले तर माझ्या मते विद्यार्थ्यांमध्ये नैतिक जबाबदारीची जाणीव होईल.ते सहानुभूती,सहिष्णुता आणि आदराची भावना जोपासतील. समाजातील गुन्हेगारी प्रवृत्ती, आक्रमकता, जातिवाद ,आत्महत्येचे वाढते प्रमाण ,बलात्कार ,धार्मिक व राजकीय संघर्ष यासारख्या प्रवृत्ती कमी होण्यास मदत होईल.आणि आजचा विद्यार्थी हा उद्याच्या देशाचा एक जबाबदार, आदर्श व्यक्तिमत्वाचा , धैर्यवान नागरिक बनेल. हे सर्व लिहीत असताना मला माझ्या वाचनात आलेल्या एका सुंदर कवितेची आठवण झाली.

अच्छा है.......
सूर्योदय से पहले उठना,
उठकर प्रातः रोज नहाना
रोज नहाकर विद्यालय जाना,
अच्छा है भई, अच्छा है.....
पूरा ध्यान लगाकर पढना,
पढ लिखकर आगे को बढना,
सभी बडों का आदर करना,
अच्छा है भई, अच्छा है......
हरदम मिठी बातें करना,
दुख को भी धीरज से सहना,
साथ सभी के मिलकर रहना,
अच्छा है भई, अच्छा भई........

**लेखिका :-**
**कु. सुनिता आश्रुबा काळुसे (स. अ.)**
**जि.प.म.उच्च प्रा.शाळा, पांग्रा डोळे. पं. स. लोणार जि. बुलढाणा.**



### भारतीय संविधानाचा अमृत महोत्सव बौद्ध महासभा नांदेड यांच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरा...

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**नांदेड :** भारतीय संविधानाचा अमृत महोत्सव भारतीय बौद्ध महासभा जिल्हा शाखा नांदेड उत्तरच्या वतीने दि.२६ नोव्हेंबर संविधान दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.प्रारंभी तथागत भगवान गौतम बुद्ध, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे दिपाने व पुष्पाने पूजन करून उपस्थित जिल्हा शाखा शहर शाखा,तालुका शाखा,वार्ड शाखांचे पदाधिकारी यांनी अभिवादन केले. त्यानंतर त्रिशरण पंचशील ग्रहण करून मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर संविधान उद्देशिकेचे सामुदायिक वाचन करण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय बौद्ध महासभेचे नांदेड जिल्हा सरचिटणीस दामोधर सरकटे होते तर जिल्हा पदाधिकारी कॅप्टन सुरेश गजभारे,सुभाष नरवाडे,ईश्वर जोंधळे, जिल्हा संघटक पत्रकार उद्धवराव सरोदे यांची प्रमुख उपस्थिती होतीं.सैनिक शेषेराव वाघमारे,सदाशिव हनुमंते,जिल्हा पदाधिकारी शहर संरक्षण उपाध्यक्ष यशवंत ढगे,कृष्णा गजभारे डिव्हिजनल ऑफिसर तथा जिल्हा संस्कार सचिव,प्रकाश सोंडारे शहर सचिव,विश्वनाथ चौदंते वार्ड अध्यक्ष भीमघाट,मेजर जनरल सुरेश गजभारे जिल्हा संरक्षण उपाध्यक्ष, ईश्वर जोंधळे आदिंनी मनोगत व्यक्त केले.सुभाष नरवाडे यांनी संविधान उद्देशिकेचे वाचन करून सर्वांना शुभेच्छा दिल्या आणि कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन जिल्हा कार्यालयीन सचिव स.ना.भालेराव यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार जिल्हा पर्यटन सचिव जनार्दन जमदाडे यांनी मानले.शेवटी सरणंत्तय गाथा घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.याप्रसंगी महिला जिल्हाध्यक्ष रेखाताई पंडित,जिल्हा कोषाध्यक्ष कांबळे ताई,मेजर कर्नल आनंद झडते,उद्धवराव सरोदे जिल्हा पदाधिकारी रामराव कदम,शहर कोषाध्यक्ष व शहर शाखा,तालुका शाखा,वार्ड शाखेचे पदाधिकारी,समता सैनिक दलाचे सैनिक व बौद्ध उपासक उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भक्तीरसाचा महासागर: श्री तेजस्वी बाबांचा ९० वा जन्मोत्सव सोहळा - वरोडीत लाखो भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ





**बातमी जगत | प्रतिनिधी**
**✦ कैलास राऊत**



**देऊळगाव माळी :** सि.राजा तालुक्यातील वरोडी नगरी आजवरच्या सर्वात भव्य आणि अलौकिक सोहळ्याची साक्षीदार ठरली. परमहंस श्री तेजस्वी बाबांच्या ९० व्या जन्मोत्सव सोहळ्याला लाखो भाविकांचा जनसागर उसळला. केवळ उपस्थिती नव्हती, तर ती अढळ श्रद्धेची, समर्पित भक्तीभावाची उत्स्फूर्त अभिव्यक्ती होती.

२१ नोव्हेंबरपासून सुरू झालेल्या या ज्ञानयज्ञाची पूर्णाहुती काल्याच्या मंगलमय कीर्तनाने झाली. पहाटे सात वाजताच बाबांची भव्य शोभायात्रा निघाली. भक्तीच्या रंगात न्हाऊन निघालेली ही यात्रा म्हणजे साक्षात् परमार्थ-प्रवाहाचे दृश्य रूप होते. शोभायात्रेत शेकडो भजनी मंडळांच्या गजरात 'पावले हळूहळू चला मुखाने तेजस्वी बाबा बोला' हा मंगलमय जयघोष वातावरणात घुमत होता, जो प्रत्येक श्रद्धेय मनाला शांतीची अनुभूती देत होता. तत्पश्चात, हरिभक्त परायण अनिरुद्ध महाराज क्षीरसागर यांच्या मुखातून शब्दसुधेचा वर्षाव झाला. त्यांनी काल्याचे कीर्तन करून, आत्मज्ञान आणि सद्भावनेचे धडे देत भाविकांना गहन आध्यात्मिक प्रेरणा दिली. या पवित्र सोहळ्यात सप्ताहाचे अन्नदान करून सेवाभावी वृत्ती जपणारे दाते आणि देणगीदार हे खऱ्या अर्थाने निष्काम कर्मयोगाचे प्रतीक ठरले. संस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करून कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. ठीक १२ वाजता, महाप्रसादाचा दिव्य सोहळा सुरू झाला. शेतकरी नेते रविकांत तुपकर, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे युवा उपजिल्हाप्रमुख प्रकाश भाऊ डोंगरे, श्रीनिवास खेडेकर, भाग्यश्री खेडेकर, रामभाऊ जाधव, दिनकरराव देशमुख, संतोष शिंगणे, सरपंच अन्नपूर्णा गारोडे या सर्व मान्यवरांच्या हस्ते या पवित्र प्रसाद वितरणाचा शुभारंभ झाला, जो ईश्वरी कृपेचा प्रसाद होता. या महाप्रसादासाठी १६५ क्विंटल गव्हाची पुरी आणि १०० क्विंटल वांग्याच्या भाजीचा नैवेद्य तयार करण्यात आला होता हा केवळ आहार नव्हे, तर तो सामुदायिक एकतेचा आणि औदार्याचा महामेरू होता. लाखो भाविकांचा हा जनसमुदाय असूनही, महाप्रसादासाठी महिला व पुरुषांकरिता १० वेगवेगळे बॅरगेट्स लावून अत्यंत शिस्तबद्ध व्यवस्थापन करण्यात आले होते. स्वयंसेवक महिलांनी आपली जबाबदारी सेवाभावनेने व उत्तम रीत्या पार पाडली. गर्दी प्रचंड असूनही, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खाडे व ठाणेदार गजानन करेवाड यांच्यासह १० अधिकारी व १०० पोलीस कर्मचाऱ्यांनी कुशल नियोजनाने कायदा व सुव्यवस्था राखली, ज्यामुळे हा धार्मिक सोहळा अत्यंत सुरळीत पार पडला.

## लग्नाला निघालेले दाम्पत्य गूढपणे बेपत्ता

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**जळगाव :** तेलंगणातून जळगावच्या दिशेने निघालेले एक दाम्पत्य अर्ध्या रस्त्यातून गूढपणे बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. या दाम्पत्याचे शेवटचे लोकेशन बुलढाणा जिल्ह्यातील वडनेर गावालगत आढळले. त्यामुळे त्यांचा घातपात झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. पोलिस सध्या या दाम्पत्याचा कसून शोध घेत आहेत.

या प्रकरणी रमेश पाटील यांनी नांदुरा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यांच्या तक्रारीनुसार, त्यांचे चुलतबंधू पद्मसिंह दामू पाटील हे तेलंगणात त्यांची पत्नी नम्रता व मुलीसह राहतात. ते तेलंगणा राज्यातील सीतापुरम येथील एका खासगी सिमेंट कंपनीत नोकरीस आहेत. 27 नोव्हेंबर रोजीस काळी 6 च्या सुमारास पद्मसिंह आपली पत्नी व मुलीसह घरच्या लग्नासाठी जळगावला येण्यासाठी निघाले. ते त्यांच्या कारने गावी येत होते. सकाळी घरून निघाल्यानंतर त्यांचे त्यांच्या भावाशी बोलणे झाले. त्यानंतर रात्री 10 वाजेपर्यंत ते घरी पोहोचणे अपेक्षित होते. पण रात्रीचे 10 वाजले तरी ते घरी पोहोचले नाही. आणखी काही वेळ वाट पाहून रमेश यांनी पद्मसिंह यांना फोन करण्याचा प्रयत्न केला. पण त्यांचा मोबाईल बंद येत होता. त्यानंतर त्यांनी त्यांची वहिणी तथा पद्मसिंह यांची पत्नी नम्रता यांना फोन केला. त्यांचाही फोन बंद येत होता. त्यानंतर कालपर्यंत म्हणजे 28 नोव्हेंबरपर्यंत नातेवाईकांनी त्यांचा फोन ट्राय केला. त्यांचा शोध घेतला. पण ते सापडले नाही. अखेर त्यांनी पोलिसांकडे धाव घेऊन ते बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलिसांनी त्यांचा शोध सुरू केला. त्यात बेपत्ता दाम्पत्याचे शेवटचे लोकेशन बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव ते मलकापूर दरम्यान महामार्गावर असणाऱ्या वडनेर गावालगत आढळले.

## गीता जयंतीचा आध्यात्मिक अर्थ

गीता जयंती हा एक महत्त्वाचा हिंदू सण आहे, जो भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला गीतेचे ज्ञान दिल्याच्या स्मरणार्थ साजरा केला जातो. या वर्षी १ डिसेंबर २०२५ रोजी येणाऱ्या मार्गशीर्ष महिन्यातील शुक्ल पक्षाच्या एकादशीला हा सण साजरा केला जातो. या दिवशी भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला गीतेचे ज्ञान दिले, जे जीवन आणि धर्माचे उद्दिष्ट स्पष्ट करते. गीता जयंतीला व्रत केल्याने मोक्ष आणि मनाची शांती मिळते अशी आख्यायिका आहे. गीता जयंती आपल्याला आपले कर्तव्य पार पाडण्यास आणि परिणामांची चिंता न करण्यास शिकवते. जयंती म्हणजे जन्म घेणे आणि दृश्यमान होणे. जन्म म्हणजे चेतनेचा. गीता जयंती! गीता माता कोण आहे? गीता ही भगवद्गीतेची जननी आहे. जर आपण तिची जयंती साजरी केली तर आपल्याला तिला जन्म देणारी व्यक्ती देखील हवी आहे. भगवद्गीता ही देवाचे गीत आहे. गीता म्हणजे गीत. ज्ञानाचे गीत. अज्ञानाचे गीत नाही. ज्ञान म्हणजे माहिती, प्रत्येक गोष्टीची अचूक माहिती, अंधश्रद्धेचा कोणताही मागमूस नाही. तुम्हाला प्रत्येक गोष्टीचे पुरावे आणि पुरावे मिळतील. म्हणूनच तिचे नाव



गीता आहे. ती गीता प्रायोगिक जीवनाला व्यावहारिकदृष्ट्या यशस्वी करते, स्त्री रूपच या ज्ञानाला यशस्वी करते. तिला गीता माता म्हणतात. आपला धर्म कोणता आहे? धर्माची जननी कोण आहे? आपला धार्मिक ग्रंथ कोणता आहे? "गीता" व्यासप्रसादत यांनी सांगितली आहे! आपल्याला गीता माता पहिल्या कवी व्यासांच्या प्रसादाने मिळाली. "कवीला कसे समजले किंवा रवीला कसे समजले?" एकतर कवी व्यासांना माहिती आहे किंवा ज्ञानाचा सूर्य रवीला गीतेचा अर्थ माहित आहे. आई काय करते? ती मुलांना जन्म देते, त्यांना दूध पाजून जीवन देते आणि पोषण देते. आईबद्दल गायले जाते "आई, हे आई, तू जगाच्या भाग्याची निर्माता आहेस" आईला आई बनवणारा बीजाच्या रूपात एक पिता असावा. आईमध्ये ज्ञानाचे बीज पेरणारा पिता कोण आहे? किंवा गीतेचा पती कोण आहे? किंवा गीतेचा देव कोण आहे? गीता ही सर्व धर्मांची आई आणि पिता आहे, सर्व धार्मिक शास्त्रांचे पालक आहेत, गीता हा पहिला शास्त्र आहे आणि इतर शास्त्रे गीतेची मुले आहेत. गीता हा पहिला शास्त्र आहे, सर्व शास्त्रांचा मुकुटरत्न आहे. शास्त्र म्हणजे शासनाचा नियम आणि कायदा हा एखाद्या जागरूक व्यक्तीने बनवला आहे जो निर्माता आहे. असे म्हटले जाते की "आई, हे आई, तू जगाच्या भाग्याची निर्माता आहेस" गीतेला कोणी जन्म दिला? हा भौतिक जन्माचा विषय नाही, तो निश्चितच दृश्यमानतेच्या स्वरूपात जन्माचा विषय आहे, म्हणूनच जन्मोत्सव साजरा केला जातो. गीता ही केवळ एक शास्त्र नाही तर एक व्यक्तिमत्व आहे जी देवाने गायलेल्या गीतेच्या ज्ञानातून जन्माला येते आणि ती त्या ज्ञानाचे व्यावहारिक जीवनात आचरण करते. अधिक जाणून घेण्यासाठी, कृपया चंद्रपूरच्या आध्यात्मिक विद्यापीठाला भेट द्या, माउंट कार्मेल जवळ, मधुबन प्लाझा शेजारी, शिवाजी नगर, चंद्रपूर, महाराष्ट्र. हे ५००, ७०० कोटी आत्मे मातेद्वारे जन्माला येतात. जे देवी लक्ष्मीला संपत्ती वाटताना दाखवतात आणि दिवाळीला तिची पूजा करतात. देवी लक्ष्मी संपत्तीचे वाटप करते का? नाही, ती ज्ञानाची संपत्ती वाटप करते. ज्ञान म्हणजे माहिती; ती या सृष्टीत भौतिक स्वरूपात आलेल्या व्यक्तीची ओळख आहे.

**अध्यात्मिक विश्व विद्यालय**
**चंद्रपुर,**
**9595782300**

## सामाजिक बांधिलकी आणि विकासाची कास जपणारे नेतृत्व: संजय पाटील आखाडे

**✦ अनिल राठोड**



**डोणगाव:** डोणगावचे माजी सरपंच आणि निष्ठावान सामाजिक कार्यकर्ते संजय पाटील आखाडे हे त्यांच्या समर्पित सामाजिक कार्यामुळे आणि गोरगरिबांच्या समस्या निवारण्यासाठी केलेल्या अथक प्रयत्नांमुळे पंचक्रोशीत एक आदरणीय आणि लोकप्रिय व्यक्तिमत्व म्हणून उदयास आले आहेत. सरपंचपदाच्या कार्यकाळात आणि त्यानंतरही त्यांनी आपली सामाजिक बांधिलकी अविरत जपली आहे. सामाजिक कार्याचा ठसा आणि धाडसी भूमिका: श्री. आखाडे हे नेहमीच जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी तत्पर असतात. गावातील सामान्य नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले आहेत. विशेष म्हणजे, सामाजिक प्रश्नांवर आवाज उठवताना त्यांनी कधीही मागे-पुढे पाहिले नाही. त्यांच्या या धाडसी स्वभावामुळे आणि "शब्दाला पक्का पाटील" या त्यांच्या वृत्तीमुळे अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लागले आहेत. विकासाभिमुख दृष्टी आणि सर्वसमावेशक नेतृत्व: सरपंच असताना त्यांनी गावाच्या विकासासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. गावातील मूलभूत सुविधा पुरवण्यावर त्यांचा विशेष भर होता, ज्यामुळे डोणगावच्या विकासाची कास धरली गेली. त्यांचे व्यक्तिमत्व हे डोणगाव नगरीतील गरीब आणि श्रीमंत यामधील एक महत्त्वाचा दुवा मानले जाते. "अठरापगड जातीला सोबत घेऊन चालणारे नेतृत्व" अशी त्यांची ओळख असून, सामान्य जनतेसाठी त्यांची भूमिका 'चालती बोलती अदालत' सारखी आहे, जिथे लोकांच्या समस्यांचे निराकरण तत्परतेने केले जाते. त्यांच्या या निस्वार्थ कार्याची नोंद अनेकदा स्थानिक पातळीवर घेतली गेली असून, ते डोणगाव पंचक्रोशीतील एक प्रभावी आणि जनहिताय समर्पित नेतृत्व म्हणून ओळखले जातात.

## सुरेश धस यांच्याकडून माझ्या जीवाला धोका

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**मुंबई :** भाजप आमदार सुरेश धस यांच्याकडून आपल्या जीवाला धोका असल्याचा दावा सुप्रसिद्ध विधिज्ञ असीम सरोदे यांनी केला आहे. त्यांनी सुरेश धस यांच्या एका कथित 1000 कोटी रुपयांच्या जमीन घोटाळ्याचा दाखला देत हा दावा केला आहे. त्यांच्या आरोपामुळे बीड जिल्ह्यातील कथित गुन्हेगारी व तेथील पुढाऱ्यांच्या कथित काळ्या कारनाम्यांचा मुद्दा पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.

असीम सरोदे यांनी शनिवारी एका मराठी वृत्तवाहिनीशी संवाद साधला. त्यात त्यांनी वरील दावा केला. ते म्हणाले, राम खाडे यांनी सुरेश यांचे 1000 कोटींची जमीन हडप केल्याचे प्रकरण काढले होते. हे प्रकरण माझ्याकडे होते. मी काही दिवसांपूर्वीच राम खाडे यांना काळजी घेण्यासी सूचना केली होती. त्यानंतर त्यांच्यावर प्राणघातक हल्ला झाला. आत्ता सुरेश धस यांच्याकडून माझ्या जीवालाही धोकाही आहे. राम खाडे यांच्यावरील हल्ल्यानंतर त्यांच्या जवळच्या लोकांनी सुरेश धस यांच्यावर गंभीर आरोप केले होते. 1000 कोटींचा भूखंड घोटाळा काढल्यामुळेच रामवर हल्ला झाल्याचे त्यांचे म्हणणे होते. सध्या राम यांच्यावर पुण्यात उपचार सुरू आहेत. तिथे त्यांची प्रकृती नाजूक असल्याचे कळते.

## नांदुरा येथे संविधान दिन 26 नोव्हेंबर पासून विद्यार्थ्यांनसाठी विपश्यना प्रशिक्षण शिबिराला सुरुवात

**बातमी जगत | प्रतिनिधी**



**बुलडाणा :** आपण बौद्ध धम्म घेऊन 68 वर्ष पूर्ण झालेली आहे आजही आपण फक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती,महापरिनिर्वाण दिन,धम्मचक्र प्रवर्तन दिन,बौद्ध पौर्णिमा,भिमा कोरेगाव,धम्मपरिषदा, भिकू संघाची धम्मदेशना हे सर्व उत्सव साजरे करतो परंतु कार्यक्रम झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी महापुरुषांचे विचार विसरून जातो त्यासाठी विपश्यना केंद्र स्थापन करून त्यातून बालपणापासून विपश्यनेतून धम्माचे मानवतेचे प्रज्ञा शिल करूणेचे विचार रूजवावे म्हणून विपश्यना केंद्राची आवश्यकता आहे हे ओळखून केंद्रासाठी लोणवाडी तालुका नांदुरा येथील दानदाते संतोष भिमराव तायडे यांनी आपल्या स्वतःच्या मालकीची दोन एकर जमिन दान देऊन सदधम्म प्रबोधन आणि विपश्यना प्रशिक्षण ट्रस्ट व डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय शासकीय वस्तीगृह नांदुरा जिल्हा बुलढाणा येथे सुरू केले.त्या ट्रस्टच्या विद्यमाने विपश्यन प्रशिक्षणाला संविधान दिनी 26 नोव्हेंबर 2025 पासून विद्यार्थ्यांना विपश्यना प्रशिक्षण शिबिराला सुरुवात झाली आहे हे विपश्यना शिबीर 26 डिसेंबर 2025 पर्यंत एक महिना विद्यार्थ्यांना एस.व्ही.सोनटक्के गृहपाल यांच्या संकल्पनेतून सदधम्म प्रबोधन आणि विपश्यना प्रशिक्षण ट्रस्ट लोणवाडी धरण व डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय वस्तीगृह यांच्या माध्यमातून विद्यार्थी मुलांवर चांगले संस्कार घडावे संस्कारातून सुसंस्कृती निर्माण होते म्हणून विपश्यनाची गरज आहे विपश्यनाची जाण व्हावी आज आपण पाहतो या बालवयातच काही मुलं खूप सेन्सिटिव्ह झालेले आहेत तसेच ॲग्रेसिव्ह सुद्धा आहेत व्यसनाकडे वळलेले आहेत उदासीनता त्या मुलांमध्ये दिसत आहे आत्महत्येचे प्रकरणे वाढत आहे द्वेष क्रोध लोभ राग या सर्व विकारातून विद्यार्थ्यांना मुक्त व्हावे या हेतूने सदधम्म प्रबोधन आणि विपश्यना प्रशिक्षण ट्रस्ट व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय वस्तीगृह यांच्या वतीने दररोज सकाळी सहा ते सात वाजे दरम्यान राहणार आहे. या शिबिराला दररोज सत्तर विद्यार्थी उपस्थित आहेत या शिबिराला प्रशिक्षक म्हणून रावसाहेब गोरे विपश्य साधक कल्याण मित्र हे प्रशिक्षण देत आहेत या शिबिराला संतोषराव तायडे संस्थापक अध्यक्ष, गोविंद वाघ प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष, दिनकर वाकोडे,किशोर इंगळे,राजेश इंगळे हे सहकार्य करीत आहे.

## घटना-घडामोडी



### मतदान यंत्रांची पारदर्शक ‘सिलींग प्रक्रिया’ पूर्ण; अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत तांत्रिक तपासणी आणि मॉक टेस्टनंतर सुरक्षित सीलबंद!

बातमी जगत | प्रतिनिधी

**दे. राजा :** दे.राजा न.प. सार्वत्रिक निवडणूक 2025 पारदर्शक, निष्पक्ष आणि विश्वासार्ह पद्धतीने पार पडावी यासाठी आज दिनांक 28 नोव्हेंबर 2025 रोजी मतदान यंत्रांची महत्वपूर्ण सिलींग प्रक्रिया नियमांनुसार पूर्ण करण्यात आली. संपूर्ण प्रक्रिया काटेकोर सुरक्षा व्यवस्थेत, तसेच निवडणुकीसाठी ठरवलेल्या सर्व कायदेशीर तरतुदींनुसार करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी सुरेश थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली, निवडणूक निरीक्षक जी. पी. साबळे, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सौ. सुप्रिया चव्हाण, तसेच अतिरिक्त सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सौ. वैशाली डोंगरजाळं यांच्या उपस्थितीत कंट्रोल युनिट आणि बॅलेट युनिट यांची सखोल तपासणी करण्यात आली.सर्वप्रथम यंत्रांची तांत्रिक पाहणी, नंतर कार्यपरीक्षण करण्यात आले. प्रत्येक बटण, प्रत्येक प्रक्रिया आणि परिणाम यांची खात्री करून घेतल्यानंतर नियमांनुसार यंत्रांची सिलींग प्रक्रिया विधिसम्मतरीत्या पूर्ण करण्यात आली. प्रत्येक प्रभागासाठी आवश्यक तेवढी यंत्रे तसेच राखीव यंत्रे स्वतंत्ररित्या सीलबंद करून सुरक्षित ठिकाणी जमा करण्यात आली. महत्त्वाचे म्हणजे संपूर्ण प्रक्रिया सर्व उमेदवार आणि उमेदवार प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत अत्यंत पारदर्शकतेने पार पडली. निवडणुकांमध्ये मतदारांचा विश्वास अबाधित राहावा, कुठल्याही प्रकारची शंका निर्माण होऊ नये आणि प्रत्येक मताची अचूक नोंद व्हावी, यासाठी प्रशासन सर्वतोपरी प्रयत्नशील आहे.
देऊळगाव राजा नगरपरिषद निवडणूक 2025 मध्ये मतदारांना विश्वासार्ह, सुरक्षित आणि अचूक मतदान सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे संबंधित अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.



### विज्ञान प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला वाव: प्राईड अकॅडमीचा उपक्रम

बातमी जगत | प्रतिनिधी
✦ गजानन औटी

**राहुरी :** विद्यार्थ्यांच्या शाळेय शैक्षणिक अभ्यासाबरोबरच त्यांच्यातील कल्पकतेला वाव मिळावा, या उद्देशाने टाकळीभान येथील प्रतिष्ठित व्यापारी प्रकाश काठेडे यांनी प्राईड अकॅडमी फ्री स्कूल, टाकळीभान च्या वतीने विज्ञान प्रदर्शनाचे नुकतेच यशस्वीरित्या आयोजन केले होते. या प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या कल्पना मूर्त रूपात आणण्याची संधी मिळाली, असे मत काठेडे यांनी याप्रसंगी व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रगतीशील शेतकरी धनराज कोकाटे हे होते. या कार्यक्रमाला डॉ. सोनल भालाराव, प्रगतीशील बंडोपंत चोरगे, अजित म्हस्के, विजय पवार, अर्जुन राऊत आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांचे स्वागत प्राईड अकॅडमीचे प्राचार्य फादर मथ्यू पवार यांनी केले.
प्राईड अकॅडमी संस्थेचे संस्थापक मा. सभापती डॉ. बटूनाताई मुरकुटे यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी सांगितले की, प्राईड पब्लिक स्कूलमध्ये सध्या मुली व अनाथ मुलांसाठी शिक्षणाचे शुल्क घेतले जात नाही. मुलांच्या घरी कोणतेही दडपण आणि अडथळे येता कामा नये, याकडे विशेष लक्ष दिले जात आहे. मुलांसाठी डिजिटल क्लासरूम, अत्याधुनिक शैक्षणिक व्यवस्था असून, कॉम्प्युटर व कोडिंग विषय शिकवणारी एकमेव संस्था प्राईड अकॅडमी असल्याचे डॉ. मुरकुटे यांनी स्पष्ट केले. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे प्रदर्शन प्रदर्शनात सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहाने व कल्पकतेने तयार केलेले विज्ञानाचे प्रकल्प सादर केले. त्यांनी प्रदर्शनातून मिळालेला अनुभव आणि उपकरणे तयार करताना घेतलेली माहिती उपस्थितांना समजावून सांगितली. त्यांच्या मातृभाषेतून आपले प्रकल्प समजावून सांगतानाचा विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाखाणण्याजोगा होता. त्यांच्या या कार्याचे मान्यवर व पालकांनी कौतुक केले, तर सर्व विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला व प्रयत्नांना शासनाकांनी शाबासकी दिली. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्राईड फ्री स्कूलचे प्राचार्य जयश्री वाडेकर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहकार्य केले.

## पान १ वरील

बॉलिवूड अभिनेता सलमान खानने पान मसाला जाहिरात वादावर न्यायालयात आपली बाजू मांडली. त्यांनी सांगितले की, त्यांनी फक्त चांदीच्या इलायचीची जाहिरात केली होती, गुटखा किंवा पान मसाल्याची नाही. सलमानने कोटा ग्राहक न्यायालयात आपले उत्तर दिले आहे.
हे प्रकरण त्या तक्रारीशी संबंधित आहे, ज्यात सलमानवर दिशाभूल करणारी जाहिरात केल्याचा आरोप लावण्यात आला होता. इंडिया टुडेनुसार, गुरुवारी सुनावणीदरम्यान सलमानचे वकील आशिष दुबे यांनी सांगितले की, हे प्रकरण ग्राहक आयोगाच्या अधिकारक्षेत्रात येत नाही. त्यांनी सांगितले की, सलमान पान मसाला बनवत नाही किंवा विकत नाही, त्यामुळे त्यांना या प्रकरणात समाविष्ट करणे योग्य नाही. वकील दुबे यांनी सांगितले की, सलमान खानने फक्त चांदीच्या इलायचीची जाहिरात केली होती, जी पान मसाल्याच्या श्रेणीत येत नाही.

# 'शारंगधर नगरी'च्या विकासासाठी तिजोरी उघडणार! - उपमुख्यमंत्री

बातमी जगत | प्रतिनिधी
✦ कैलास राऊत



**मेहकर :** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना (शिंदे गट) पक्षाचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी मेहकर शहरवासीयांना व्हिडिओ क्लिपद्वारे थेट भावनिक व राजकीय आवाहन केले आहे. त्यांनी `धनुष्यबाण` निशाणीचे बटन दाबून नगराध्यक्ष पदाचे उमेदवार अजय उमाळकर आणि २६ नगरसेवक उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन केले आहे. शिंदे यांनी बुलढाणा व सिंदखेड राजा येथील प्रचारसभांच्या निमित्ताने जिल्ह्यात उपस्थित असताना, मेहकरमधील मतदारांसाठी हा व्हिडिओ संदेश जारी केला. मतदारांना आवाहन करताना उपमुख्यमंत्री शिंदे यांनी मेहकरच्या विकासाला केंद्रस्थानी ठेवले. ते म्हणाले: मेहकर ही प्रसिद्ध शारंगधर नगरी आहे. तुम्ही धनुष्यबाणाचे बटन दाबून सर्व उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करा. मी तुम्हाला ग्वाही देतो की, शारंगधर नगरीच्या विकासासाठी निधीची कुठेही कमतरता भासू देणार नाही! केंद्र आणि राज्यामध्ये महायुतीचे भरभक्कम सरकार असल्याने शहराच्या सर्वांगीण विकासासाठी मग ते रस्ते, नाल्या बांधकाम, उद्याने, भुयारी गटार योजना किंवा पाणीपुरवठा योजना असो - सरकार म्हणून कुठेही निधी कमी पडू देणार नाही, असे ठाम आश्वासन त्यांनी दिले. त्यांनी स्पष्ट केले की, शिवसेनेला मत म्हणजे विकासाला मत, धनुष्यबाणाला मत म्हणजे अर्थात विकासाला मत आहे! त्यामुळे आपले मतदान व आशीर्वाद शिवसेना (शिंदे गट) पक्षाच्या उमेदवारांच्या पाठीशी असू द्या, असे आवाहन त्यांनी केले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या नेतृत्वाखालील सरकारने मेहकर शहरासाठी आणलेल्या महत्त्वपूर्ण विकासकामांचा लेखाजोखाही सादर केला.
माजी मुख्यमंत्री म्हणून त्यांनी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली आणि तत्कालीन आमदार संजय रायमुलकर यांच्या प्रयत्नांतून शहर विकासासाठी तब्बल ९३२ कोटी रुपयांचा निधी आणल्याचे स्पष्ट केले.
यामध्ये १२४ कोटी रुपयांच्या पेनटाकळी प्रकल्पावरून नवीन वाढीव पाणीपुरवठा योजनेचा समावेश आहे. शहरातील चार मोठ्या पाणी टाक्यांचे काम पूर्ण झाले असून, जुन्या शहरासह नवीन भागातही जलवाहिन्या टाकण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे.
सध्या मेहकर शहर ते पेनटाकळी प्रकल्पापर्यंत पाईपलाईन टाकण्याचे काम प्रगतीपथावर आहे. येत्या चार महिन्यांत हे काम पूर्ण झाल्यानंतर शहराला २४ तास पाणीपुरवठा केला जाईल आणि प्रत्येक नळधारकाच्या ठिकाणी पाणी मीटर बसविले जाणार आहे. उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या या थेट आणि भावनिक आवाहनामुळे मेहकरमधील नागरिकांच्या विकासाच्या अपेक्षा पल्लवीत झाल्या आहेत. निधीची कमतरता पडू देणार नाही या आश्वासनाला मेहकरचे मतदार सकारात्मक प्रतिसाद देतील, अशी राजकीय वर्तुळात चर्चा आहे.

## डोणगाव येथे म. ज्यो. फुले यांना अभिवादन; समता परिषदेच्या वतीने स्मृती दिन साजरा



बातमी जगत | प्रतिनिधी
✦ अनिल राठोड

**डोणगाव :** दि. 28 नोव्हेंबर रोजी महात्मा ज्योतिबा फुले यांचा स्मृती दिन डोणगाव येथे म. फुले समता परिषदेच्या वतीने साजरा करण्यात आला. यावेळी विविध मान्यवरांनी आणि ग्रामस्थांनी महात्मा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी प्रामुख्याने मा.श्री. शैलेशजी सावजी यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमासाठी म. फुले समता परिषदेचे तालुका अध्यक्ष संदीप पांडव, सरपंच शिवचरण आखाडे, उपसरपंच श्याम इंगळे, तसेच पवन काळे, श्याम पांडव, गजानन सोनूने, आकाश काळे, बाळा खोडके, संतोष ताठे, चेतन पवार, सागर ताठे, ऋषीकेश पांडव सागर पांडव गणेश घोगलआणि समता सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी महात्मा फुले यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याचे स्मरण करून त्यांना आदरांजली वाहिली.

## संविधानामुळे एकसंध भारताची निर्मिती - प्रशांत देशमुख यांचे प्रतिपादन

### बाल शिवाजी विद्यानिकेतन मध्ये संविधानदिन साजरा

बातमी जगत | प्रतिनिधी
✦ इमरान सैय्यद



**मालेगांब :** भारताला मिळाल्यानंतर स्वातंत्र्य विविधतेत एकता साधत असताना देशाला आवश्यक असणाऱ्या सर्व तरतुदी संविधानात आहेत. संविधानातील तरतुदीमुळेच एकसंध भारताची निर्मिती झाली आहे. देशाचे अखंडत्व यापुढेही अबाधित राहील, अशा तरतुदी संविधानात आहेत, असे बाल शिवाजी मराठी विद्यानिकेतन मध्ये आयोजित संविधानदिन रोजी यांनी व्यक्त व्यक्त केले.
यावेळी इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी अतिशय उत्कृष्ट प्रकारे कार्यक्रमाचे आयोजन केले. कार्यक्रमाची सुरुवातीला भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले, कार्यक्रमांतर्गत भारतीय संविधान त्याची महत्त्वकांक्षा आणि शासन प्रणालीमध्ये असणारे महत्त्व याविषयी माहिती देण्यात आली कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक प्रशांत देशमुख सर होते तर प्रमुख अतिथी म्हणून शाळेचे अध्यक्ष अरविंद देशमुख सर तसेच मालेगाव पंचायत समिती अंतर्गत कार्यरत असणारे विशेष कोहळे सर उपस्थित होते तर कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून संस्थेचा सचिव सौ रंजना देशमुख मॅम उपस्थित होत्या,तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक मच्छिंद्र देवदरे सर यांनी केले या कार्यक्रमांतर्गत इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी भारतीय संविधानाबद्दल माहिती सर्वांसमोर विशद केली तर इयत्ता ८ वी तील विद्यार्थ्यांनी सुंदरशा गीताच्या माध्यमातून उपस्थितांची मने जिंकली तर इयत्ता पहिलीतील विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची वेशभूषा करून भारतीय संविधानाबद्दल जनजागृती केली. संविधान दिनाच्या कार्यक्रमाची रूपरेषा आखणी वर्गशिक्षिका कु जे एन सरकटे यांनी केली तर कार्यक्रमाचे संचालन विद्यार्थी पोगे व गायकवाड यांनी केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आदींनी अथक असे परिश्रम घेतले.

## म्हणुनच महात्मा फुलेंचे कार्य व विचार अजरामर -आ . अमित झनक

बातमी जगत | प्रतिनिधी
✦ इमरान सैय्यद



**मालेगांव :** क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांनी यांनी पुण्यासारख्या सनातन्यांचे वर्चस्व असलेल्या शहरात त्यांचा विरोध झुगारून मुलींसाठी देशातील पहिली शाळा स्थापन करून स्त्रियांच्या उन्नतीचा मार्ग मोकळा करून दिला . तसेच माजी आमदार स्वर्गीय रामरावजी झनक यांनी वाशिम जिल्ह्यातील अतिशय दुर्गम भागामध्ये शाळा काढून शिक्षणाची गंगा गोरगरिबांपर्यंत पोहोचवण्याचे काम त्याकाळी केले. म्हणून या दोन्ही महामानवांचे कार्य आजही अजरामर आहे .अशा प्रकारचे विचार आमदार अमित झनक यांनी मालेगाव येथे महात्मा फुले स्मृतिदिन व स्वर्गीय रामराव झनक स्मृतिदिन निमित्त बोलताना व्यक्त केले . क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि स्वर्गीय रामरावजी झनक यांची पुण्यतिथी मालेगाव येथे शिवम गॅस एजन्सी च्या सभागृहात साजरी करण्यात आली. यावेळी शहरातील असंख्य नागरिकांची उपस्थिती होती. सर्वप्रथम त्यांच्या प्रतिमांना मालार्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी मराठा सेवा संघाचे राज्य कार्यकारणी सदस्य प्राचार्य वसंतराव अवचार तसेच राज्य संघटक प्राध्यापक भरत आव्हाळे, रवीभाऊ भुतडा, प्रवीण पाटील ,मराठा सेवा संघ तालुकाध्यक्ष तेजराव पाटील जाधव ,सचिव अशोकराव जाधव ,नागेश कव्हर, प्रशांत वाझुळकर, दिनकरराव पोफळे , शिवशंकर कव्हर ,संतोष साठे, संतोष बाजड ,सुखदेव बाजड ,विष्णू कव्हर ,मयूर कव्हर ,विजय शिंदे ,विशाल सोभागे, भारत गुडदे, नेताजी चंद्रशेखर, पंजाबराव घुगे, संतोष बाजड, शशिकांत तनमने , शेख असिफ, गफ्फार शहा आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

## बुलढाणा शहराचे आधारस्तंभ हरपले! माजी सभापती मुक्ताबाई खरे यांचे निधन

बातमी जगत | प्रतिनिधी



**बुलढाणा :** आज २९ नोव्हेंबर रोजी बुलढाणा शहरावर शोककळा पसरली आहे. ज्यांनी आपल्या कार्याने आणि साधेपणाने शहराच्या सार्वजनिक जीवनात एक अमिट छाप सोडली, अशा बुलढाणा नगरपरिषदेच्या माजी शिक्षण सभापती आणि संत काशिनाथ बाबा संस्थानच्या अध्यक्षा मुक्ताबाई शामराव खरे यांचे वृद्धापकाळामुळे 29 नंबर रोजी रात्री निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८७ वर्षे होते. त्यांच्या निधनामुळे बुलढाण्याने केवळ एक राजकीय नेत्या नव्हे, तर मातृवत व्यक्तिमत्त्व आणि संस्थेची आधारस्तंभ गमावली आहे. मुक्ताबाई खरे यांचे जीवन म्हणजे जनसेवा, शिक्षण आणि अध्यात्म यांचा एक सुंदर संगम होता. नगर परिषदेच्या शिक्षण सभापती म्हणून त्यांनी शिक्षण क्षेत्रात दिलेले योगदान पिढ्यानपिढ्या प्रेरणा देत राहील. एका बाजूला सार्वजनिक जीवनातील कठोर कर्तव्य आणि दुसऱ्या बाजूला संत काशिनाथ बाबा संस्थानचे अध्यक्षपद सांभाळत त्यांनी अध्यात्माची ओढ कायम ठेवली. त्यांनी समाजाला दिलेला वेळ, त्यांची शांत आणि संयमी वृत्ती, तसेच त्यांचे निरपेक्ष सेवाभावी कार्य कायम स्मरणात राहील. बुलढाण्यातील अनेकांना त्यांच्या आधाराने जीवनात योग्य दिशा मिळाली होती. त्यांचे जाणे म्हणजे शहरातील एका ज्येष्ठ मार्गदर्शकाचा आधारवड कोसळण्यासारखे आहे. वयाच्या ८७ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी आणि नातवंडांचा मोठा परिवार आहे. कुटुंबावर कोसळलेल्या या दुःखाच्या क्षणी, संपूर्ण बुलढाणा शहर त्यांच्यासोबत उभे आहे. मुक्ताबाई खरे यांच्या पार्थिवावर आज, रविवार ३० नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता इकबाल चौक स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## बुलढाणा नगर परिषद निवडणूक: महाविकास आघाडीच्या प्रचाराला उत्साहाचे भरते!

बातमी जगत | प्रतिनिधी
✦ कैलास राऊत





**बुलढाणा :** बुलढाणा नगर परिषदेच्या बहुप्रतिक्षित सार्वत्रिक निवडणुकीच्या निमित्ताने, महाविकास आघाडीच्या उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करण्यासाठी बुलढाणा शहरात काल दिनांक २९ नोव्हेंबर रोजी जबरदस्त प्रचार रॅलीचे आयोजन करण्यात आले. ही रॅली केवळ उमेदवारांचा प्रचार नव्हती, तर स्थानिक विकासाचे व्हिजन आणि सामूहिक राजकीय इच्छाशक्तीचे प्रगल्भ दर्शन घडवणारी ठरली. बुलढाण्याच्या विकासाचा अजेंडा घेऊन, जनतेच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी काँग्रेस आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख नेते आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने या राजकिय रणसंग्रामात सहभागी झाले विकासाचा संकल्प आणि नेतृत्वाचे नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार काँग्रेस पक्षाच्या लक्ष्मीताई दत्ता काकस यांना विजयी करण्याचा निर्धार यावेळी बुलढाणा करांनी केला नेतृत्वाची धुरा महिलांच्या हाती देण्याचा पुरोगामी विचार या निमित्ताने ठळकपणे समोर आला. याचबरोबर, प्रभाग क्र. १५ अ च्या शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या उमेदवार संध्याताई राजेश ठोंबरे आणि प्रभाग क्र. १५ ब चे उमेदवार सुनीलभाऊ प्रतापराव सपकाळ यांच्यासाठी मतदारांना साद घालण्यात आली. स्थानिक पातळीवरील प्रश्नांवर आणि मूलभूत सुविधांवर लक्ष केंद्रित करून सामान्य नागरिकांच्या आकांक्षा पूर्ण करण्याचे वचन या उमेदवारांनी दिले. या महत्त्वपूर्ण प्रचार रॅलीला महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांनी उपस्थित राहून उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करण्याची आव्हान केले यावेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाच्या राज्य प्रवक्त्या एडवोकेट जयश्रीताई शेळके ,पक्षाचे जिल्हाप्रमुख जालिंदरभाऊ बुधवत, शिक्षक पदवीधर मतदारसंघाचे आ. धीरज लिंगाडे, काँग्रेस नेते संजय राठोड, शिवसेना जिल्हा समन्वयक संदीप शेळके, जिल्हा संघटक डी.एस.लहाने सर, डॉ. पुरुषोत्तम देवकर, हेमंत खेडेकर, ऍड. विजय सावळे, ऍड. नंदूभाऊसाखरे, अशोक गव्हाणे, तालुकाप्रमुख विजय इतवारे, गजानन धांडे आदी मान्यवरांनी रॅलीत सहभाग घेतला. या नेत्यांच्या उपस्थितीमुळे, ही निवडणूक केवळ स्थानिक नसून राजकीय विचारधारा आणि तत्त्वनिष्ठेचा लढा असल्याचे स्पष्ट झाले. आ. धीरज लिंगाडे यांच्यासारख्या विधिमंडळातील प्रतिनिधींच्या सक्रिय सहभागाने, स्थानिक स्वराज्य संस्था आणि राज्याच्या विकासाची जोडणी किती महत्त्वाची आहे, हे अधोरेखित केले.लोकशाहीचा जागर प्रचारादरम्यान, या प्रमुख उमेदवारांना आणि नेत्यांना नागरिकांचा उत्स्फूर्त व प्रचंड प्रतिसाद लाभला. मोठ्या संख्येने प्रभागातील नागरिक रॅलीत सामील झाले. ही गर्दी केवळ बघ्यांची नव्हती, तर बदल घडवण्यासाठी सज्ज असलेल्या मतदारांची होती. रॅलीच्या माध्यमातून जनतेच्या मनात असलेला विश्वास आणि सत्तेच्या केंद्रीकरणाविरुद्धचा सामूहिक आवाज प्रकट झाला. या प्रचार रॅलीने बुलढाणा नगर परिषदेच्या निवडणुकीच्या वातावरणात एक नवा उत्साह आणि राजकीय ऊर्जेचे वातावरण निर्माण केले आहे. विकासाचे विचार घेऊन मैदानात उतरलेल्या महाविकास आघाडीच्या उमेदवारांना जनता बहुमताने कौल देईल, असा विश्वास यावेळी नेत्यांनी व्यक्त केला.

## घटना - घडामोडी



### नामसंकीर्तन सोहळा! नामस्मरणाने चित्त शुद्ध होते - रवींद्र गुरुव महाराज

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ कैलास राऊत

**दे.माळी :** येथील श्री संत जनार्दन स्वामी सेवा आश्रमाच्या वतीने आयोजित संत जनार्दन स्वामी पुण्यतिथी, गीता जयंती व दत्त जयंती सोहळ्यानिमित्त सुरू असलेल्या श्री संत जनार्दन स्वामी मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात, काल दिनांक २९ नोव्हेंबर २०२५ रोजी ह.भ.प. रवींद्र महाराज गुरव (कदमापूर) यांच्या सुश्राव्य कीर्तन सेवेने भक्तीचा दिव्य आणि वैचारिक जागर झाला. महाराजांनी वारकरी संप्रदायाचा प्राण असलेल्या संत नामदेव महाराजांच्या अभंगावर आधारित विवेचन करून उपस्थितांना मुक्तीचा सोपा मार्ग उलगडून दाखवला. महाराजांनी आपल्या निरुपणात सांगितले की, परमेश्वराला आवडणारी भक्ती गुंतागुंतीची किंवा कर्मकांडावर आधारित नाही. ईश्वराच्या नावाचे स्मरण सतत करणे. नामसंकीर्तन हाच कलियुगातील सर्वोत्तम धर्म आहे. नामस्मरणाने चित्त शुद्ध होते आणि साधक परमार्थाच्या मार्गावर स्थिर होतो. तुळशी माळ, गोपीचंदनाचा टिळा ही वैष्णवांची केवळ बाह्य ओळख नसून, 'हृदयी कळवळा वैष्णवांचा' ही त्यांची खरी आंतरिक ओळख आहे. म्हणजेच, वैष्णव धर्माचे पालन करणाऱ्या प्रत्येक जीवाविषयी प्रेम, दया आणि कळकळ बाळगणे, हीच खरी परमेश्वराची सेवा आहे. वैष्णवांचा कळवळा म्हणजे सर्व प्राणीमात्रांवर प्रेम.

अशा प्रकारे, अभंगातून नामस्मरण आणि भूतदया यांचा सुरेख समन्वय साधून शुद्ध वारकरी धर्माचा संदेश दिला गेला.

या कीर्तन सेवेला देऊळगाव माळी येथील असंख्य भाविक भक्त, टाळकरी, माळकरी आणि भजनी मंडळांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रवणाचा लाभ घेतला. दिनांक ३ डिसेंबरपर्यंत चालणाऱ्या या भव्य सोहळ्यात महाराष्ट्रातील विविध नामांकित कीर्तनकारांचे वैचारिक आणि रसाळ कीर्तन श्रवण करण्याची पर्वणी भाविकांना मिळणार आहे: आज (३० नोव्हेंबर) ह.भ.प. शंकर महाराज इंगोले (येवता) ०१ डिसेंबर: ह.भ.प. अमोलनंद महाराज (सच्चिदानंद आश्रम, सावत्रा) ०२ डिसेंबर: ह.भ.प. शंकर महाराज देवकर (सोनाटी) ०३ डिसेंबर ह.भ.प. प्रकाश महाराज मगर यांचे काल्याचे कीर्तन.

ग्रंथ विमोचन व पालखी मिरवणूक सोहळ्यादरम्यान, श्री संत जनार्दन स्वामी सेवा आश्रमाचे अध्यक्ष बळीराम गिरी महाराज (आयुर्वेदाचार्य) लिखित 'संत बोधामृत' या महत्त्वपूर्ण ग्रंथाचे कीर्तन सेवेत विमोचन होणार आहे. या ग्रंथातून संत विचारांचे सार भाविकांना प्राप्त होईल. तसेच, दिनांक १ डिसेंबर रोजी श्री दत्तगुरू पालखी आणि जनार्दन वामींच्या मूर्तीची भव्य मिरवणूक गावातून काढण्यात येणार आहे. या भक्तीमय सोहळ्यात देऊळगाव माळी गावातील सर्व भाविक, भजनी मंडळ आणि वारकरी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

या सर्व कार्यक्रमांच्या माध्यमातून देऊळगाव माळी येथे नामसंकीर्तनाचा आणि वैचारिकतेचा संगम अनुभवण्यास मिळत असून, या अध्यात्मिक सोहळ्यामुळे समस्त भक्तांच्या जीवनात परमार्थ आणि सेवाभावाची भावना अधिक दृढ होणार आहे. सर्व भाविक भक्तांनी या भक्तीमय सोहळ्याचा आनंद घ्यावा त्याचबरोबर तीन डिसेंबर रोजी होणाऱ्या भव्य महाप्रसाद सोहळाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे आव्हान श्री संत जनार्दन स्वामी सेवाश्रमाच्या वतीने करण्यात आले आहे.



### महायुतीतील उमेदवार निळकंठ म्हात्रे व सुनिता जोशी यांना भरघोस मताने निवडून देण्याचे आवाहन !

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ किरण बांधणकर

**पेण :** पेण मध्ये महायुतीमध्ये दुरावा निर्माण झाला असून भाजप,राष्ट्रवादी आणि आरपीआय हे युतीतून आपले पदाचे उमेदवार उभे करून नगरपालिका निवडणूक लढवत आहे.तर पेणमध्ये महायुतीतील शिवसेनेने वेगळी चूल मांडून आपले उमेदवार उभे केले आहेत यामुळे प्रभाग १० मध्ये झालेल्या उमेदवारांचा संभ्रम नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रीतम पाटील यांनी बोलताना दूर केला. २ डिसेंबर रोजी निवडणूक होत असल्याने महायुतीतील सर्व उमेदवार भरघोस मतांनी निवडून आणण्यासाठी घरो घरी उमेदवारांचा प्रचार करत आहेत त्यांना जनतेकडून ही प्रतिसाद मिळत आहे. पेण नगरपालिकेचे महायुती नगरपालिका नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार यांच्यासह उमेदवार प्रचाराला उतरले आहेत तर महायुतीचे ६ नगरसेवक बिनविरोध विजयी झाले आहेत तर प्रभाग क्रमांक १० मधील महायुतीचे नगरसेवक पदाचे उमेदवार निळकंठ सखाराम म्हात्रे आणि सुनीता शिवराम जोशी (जना आत्या) यांच्या प्रचाराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद व मतदारांचा वाढता पाठींबा दिसून येत असल्याने प्रभाग १० मधील उमेदवार निळकंठ म्हात्रे व सुनीता जोशी यांचा विजय निश्चित होणार असल्याने मतदारांनी उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने निवडून देण्याचे आवाहन प्रितम पाटील यांनी प्रचारा दरम्यान बोलताना मतदारांना केले.

### तरुणावर लोखंडी गजाने हल्ला

**पुसद :** तालुक्यातील हिवाळणी (पालमपट) येथे वादातून तिघांनी मिळून एका तरुणाला लोखंडी गजाने मारहाण करून गंभीर जखमी केल्याची घटना २७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७:३० वाजता घडली. प्रशांत नामदेव भगत (रा. हिवाळणी) याच्याशी आरोपी संदीप भगवान मनवर (३५), राहुल सूर्यभान मनवर (२८) आणि बाळू जगता मनवर (३८, सर्व रा. हिवाळणी) यांनी संगनमत करून वाद घातला. शिवीगाळ करत त्यांनी प्रशांतच्या डोक्यात लोखंडी गजाने वार केले, ज्यात तो जखमी झाला. तसेच, त्याला जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी प्रशांत भगत याने २८ नोव्हेंबर रोजी खंडाळा पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

# मेहकरमध्ये 'गारोळे फॅक्टर'ची लाट! नगराध्यक्ष बनविण्यासाठी जनतेनेच हाती घेतली न.प. निवडणूक!

## जयश्रीताई शेळके यांनी अनुभवला 'किशोर गारोळेमय' माहोल; 'जनशक्ती'च्या बळावर विजयाचा व्यक्त केला ठाम विश्वास

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ कैलास राऊत





**मेहकर :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार किशोर गारोळे यांना नगराध्यक्षपदी विराजमान करण्यासाठी मेहकरच्या जनतेने नगर परिषदेची निवडणूक हाती घेतली आहे. कोणत्याही परिस्थितीत किशोर गारोळे यांनाच नगराध्यक्ष बनवायचे आहे, असा ठाम निर्धार मेहकर शहरवासियांनी केला आहे. या निर्धारामुळेच हजारोजण किशोर गारोळे यांच्या उपरोक्ष त्यांचा प्रचार करीत आहेत. अशापद्धतीने मेहकरची जनता किशोर गारोळे यांचा परस्पर प्रचार करीत असल्याने मेहकर शहर हे किशोर गारोळेमय झाले आहे. किशोर गारोळे यांचा हा माहोल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या प्रदेश प्रवक्त्या जयश्रीताई शेळके यांनी काल (ता. २९) अनुभवला. त्या किशोर गारोळे यांच्या प्रचार रॅलीनिमित्ताने मेहकरमध्ये आल्या होत्या. मेहकरमधील प्रभाग एक अन् प्रभाग १२ मधील रॅलीमध्ये त्या सहभागी झाल्या. यावेळी त्यांनी किशोर गारोळे हेच नगराध्यक्ष होणार, असा विश्वास व्यक्त केला. यावेळी स्व. दिलिपराव रहाटे यांच्या पत्नी निर्मला रहाटे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे मेहकर तालुकाप्रमुख निंबाजी पांडव, आमदार सिद्धार्थ खरात यांचे पुत्र सार्थ खरात उपजिल्हाप्रमुख प्रकाश भाऊ डोंगरे यांच्यासह शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नगरसेवक,नगरसेविका पदाचे उमेदवारही उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने नगराध्यक्ष पदाचे उमेदवार किशोर गारोळे, प्रभाग एक मधील उमेदवार रुपालीताई गारोळे, प्रा. सतीश ताजने अन् प्रभाग १२ मधील उमेदवार लता अडेलकर हेदेखिल उपस्थित होते. यासोबतच, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे महिला आघाडीच्या उपजिल्हाप्रमुख आरती देशमुख, महिला आघाडी तालुकाप्रमुख स्वाती नवले, महिला आघाडीच्या शहरप्रमुख पौर्णिमा गवई, अमोल बोरे यांच्यासह शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते देखिल रॅलीमध्ये सहभागी झाले होते. यावेळी जनशक्तीची मन:शक्ती किशोर गारोळे यांच्याच बाजूने असल्याचे सर्वांना अनुभवायला मिळाले. जनशक्तीच्या आशीर्वादानेच किशोर गारोळे हे नगराध्यक्ष होणार, अशी चर्चा आता सगळीकडे सुरू झाली आहे.किशोर गारोळे नगराध्यक्ष म्हणजे, आम्ही सर्व नगराध्यक्ष! किशोर गारोळे हे नगराध्यक्ष झाले म्हणजे मेहकर शहरातील प्रत्येकजण नगराध्यक्ष झाला!, अशी भावना मेहकर शहरवासीय बोलून दाखवत आहेत. किशोर गारोळे यांना आपण कधीही भेटू शकतो. आपुलकी अन् हक्काने त्यांच्या घरीदेखिल जाऊ शकतो. कोणतेही काम हक्काने सांगू शकतो. त्यामुळे माणुसकी, नम्रता अन् सज्जन असलेले किशोर गारोळे हे मेहकर शहरवासियांना काळजातून जपणारे आहेत. त्यांनाच नगराध्यक्ष बनविणार आहेत, अशी चर्चा मेहकर शहरात ऐकायला मिळत आहेत.

## प्रा. डॉ. समता कस्तुरे यांना आचार्य पदवी प्रदान

बातमी जगत | प्रतिनिधी



**मेहकर :** विवेकानंद विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, हिवरा आश्रम येथे कनिष्ठ महाविद्यालयात प्राणीशास्त्र विषयाच्या प्राध्यापिका असलेल्या प्रा. डॉ. समता नायबराव कस्तुरे यांना आचार्य पदवी ( Ph .D.) मिळाल्याबद्दल विवेकानंद विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, हिवरा आश्रम येथे सत्कार करण्यात आला.

प्रा. डॉ. समता कस्तुरे यांचा सत्कार विवेकानंद विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य , गीतकार व लेखक आर.डी. पवार यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी विवेकानंद आश्रमाचे सचिव व सुप्रसिद्ध वक्ते संतोष गोरे आणि विवेकानंद विद्या मंदिराचे पर्यवेक्षक , लेखक, वक्ते व मराठी साहित्याचे अभ्यासक एस.एल. भारती यांची विशेष उपस्थिती होती.

प्रा. डॉ. समता कस्तुरे यांनी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती या विद्यापीठामधून डॉ. व्ही. आर. काकडे यांच्या मार्गदर्शनामध्ये आचार्य पदवी प्राप्त केली आहे. प्रा. डॉ. समता कस्तुरे यांनी ECOLOGICAL STUDY ON AVIFAUNA AMONG SELECTED HABITATS OF BULDANA REGION, MAHARASHTRA INDIA या विषयांमध्ये आचार्य पदवी प्राप्त केली आहे.

प्रा. डॉ. समता कस्तुरे यांच्या सत्कारापूर्वी विवेकानंद आश्रमाचे सचिव संतोष गोरे यांनी आचार्य पदवी विषयी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आचार्य पदवी प्राप्त करण्यासाठी करावी लागणारे मेहनत याविषयीची माहिती संतोष गोरे यांनी यावेळी विद्यार्थ्यांना दिली.

सत्काराला उत्तर देतांना प्रा. डॉ. समता कस्तुरे यांनी पक्षाच्या ( birds ) जीवनाची विद्यार्थ्यांना माहिती दिली. कोणत्याही परिस्थितीमध्ये पक्षी हे हार मानत नाहीत तर , आपला जीवन प्रवास सुरूच ठेवतात. असे सांगत असतांना, विद्यार्थ्यांनी सुद्धा जीवनामध्ये हार न मानता आपला प्रवास आत्मविश्वासाने सुरू ठेवावा असा मोलाचा संदेश दिला.

" आपण ज्या विवेकानंद परिवारामध्ये अध्यापनाचे कार्य करतो ;त्याच परिवाराकडून आपल्याला आचार्य पदवी प्रदान झाल्यानंतर झालेला सत्कार हा अविस्मरणीय आहे आणि जीवनामध्ये नवीन ऊर्जा निर्माण करणार आहे ", असे मत दैनिक दैनिक बातमीजगत च्या प्रतिनिधी सोबत बोलतांना प्रा. डॉ. समता कस्तुरे यांनी व्यक्त केले. सांस्कृतिक विभागाच्यावतीने कार्यक्रमाचे उत्कृष्ट आणि सदाबहार सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. डॉ. ज्ञानेश्वर गाडे यांनी केले.

## गुरू तेग बहादूर यांच्या 350 व्या शताब्दी वर्षानिमित्त विशेष कार्यक्रम उत्साहात

बातमी जगत | प्रतिनिधी



**बुलढाणा :** 'हिंद दी चादर' गुरू तेग बहादूर साहिब यांच्या 350 व्या शताब्दी वर्षानिमित्त दि न्यू इरा हायस्कूलमध्ये विशेष कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य अविनाश कुलकर्णी यांच्या हस्ते गुरू तेग बहादूर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून झाली. शरद गोमासे यांनीही माल्यार्पण करत गुरूंना अभिवादन केले. विद्यार्थ्यांसाठी दाखविण्यात आलेल्या 3 मिनिटांच्या माहितीपूर्ण चित्रफितीतून गुरूंच्या अद्वितीय त्यागाचा, धार्मिक स्वातंत्र्यासाठी दिलेल्या लढ्याचा आणि मानवतेसाठी केलेल्या अप्रतिम कार्याचा आढावा घेण्यात आला. गणेश आसेरकर यांनी गुरू तेग बहादूर यांच्या जीवनकार्यावर सखोल माहिती देत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला विद्यार्थ्यांसह शिक्षकवर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# जिल्हा मध्यवर्ती बँक प्रतिनिधी म्हणून दिलीप काकडे यांची निवड

## गजानन केळे यांचे सलग दहा वर्षापासून वर्चस्व कायम

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ इमरान सैय्यद



**मालेगांव :** अकोला वाशिम जिल्हा मध्यवर्ती बँक निवडणूक प्रतिनिधी म्हणून मालेगाव तालुक्यातील ग्राम मुंगळा येथील दिलीप काकडे यांचे सर्वानुमते निवड करण्यात आली. मुंगळा गांव मालेगाव तालुक्यात सामाजिक तथा राजकीय दृष्टीने महत्त्वाचे असून मुंगळा येथील मागील दहा वर्षापासून मागील पाच वर्षात दयांकडे यांच्या गटाचे नाव सदस्य ग्रामपंचायत मध्ये निवडून आले होते यावेळेस गजानन कडे यांच्या गटाची सहा तर संतोष लोहन राऊत माजी सरपंच उद्धवराव राऊत यांच्या गटाचे तीन सदस्य मिळून उपसरपंच गणेश राऊत यांचे वर्चस्व दहा वर्षापासून ग्रामपंचायत वर आहेआता पुन्हा मुंगळा येथील सेवा दि अकोला मध्यवर्ती सहकारी बँक मध्ये सेवा सहकारी सोसायटीच्या प्रतिनिधी पदी माजी उपसरपंच गजानन प्र. केळे यांच्या पॅनलचे दिलीप काकडे प्रतिनिधी म्हणून यांची निवड करण्यात आली. एक नंबर वर खातेदार आहेत येथील सोसायटीच्या शेतकरी सदस्याकडून जिल्हा मध्यवर्ती बँकेला लाखो रुपये उत्पन्न आहे हे सोसायटी मालेगाव तालुक्यात एक नंबर आहे ते अकोला जिल्हा मध्यवर्ती बँकेमध्ये मुंगळा येथील सोसायटीचा सदस्य निवडणूक प्रतिनिधी नियुक्त केला जातो त्यावर्षी मुंगळा येथील शेतकरी दिलीप काकडे यांचे एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली यासाठी सोसायटीचे अध्यक्ष राजू केळे शिवा का सहकारी सोसायटीचे उपाध्यक्ष पांडुरंग राऊत उपसरपंच गजानन केळे माजी सरपंच तथा माजी प सं सदस्य उद्धवराव राऊत माजी सरपंच डिगांबर पवार नारायण काटकर बंडू केळे संचालक आनंदा पवार लक्ष्मण पट्टेबहादूर भरत पाटील नरोटे संतोष बबन राऊत मदन मुळे रमेश भांदुर्गे गणेश आघाव वनमला बाई घुगे विठोबा जामकर सौ .सरिता राजू तहकीक सौ शितल किशोर ठाकरे अरुन पवार बाळू केळे यावेळी उपस्थित होते

## दे.राजा न. प. आणि छत्रपती शिवाजी विद्यालयाचा अभिनव उपक्रम



बातमी जगत | प्रतिनिधी

**देऊळगाव राजा :** दे.राजा नगर परिषद आणि छत्रपती श्री शिवाजी महाराज विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने काल, शनिवारी, शहरात मतदार जनजागृतीचा एक अत्यंत प्रभावी उपक्रम राबवण्यात आला. लोकशाहीचे महत्त्व आणि मतदानाची जबाबदारी जनमानसापर्यंत पोहोचवण्यासाठी विद्यालयाच्या प्रांगणात विद्यार्थ्यांनी 'मानवी GO VOTE' अशी भव्य आणि लक्षवेधी प्रतिकृती साकारली.

यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधून, 'मतदान हा लोकशाहीचा आत्मा आहे' हे पटवून देण्यात आले. विद्यार्थ्यांनी मतदानाचे महत्त्व पालकांपर्यंत पोहोचवावे आणि कुटुंबात मतदानासाठी सकारात्मक वातावरण निर्माण करावे, जेणेकरून मतदानाचा टक्का वाढेल, असे विशेष आवाहन करण्यात आले. या अभिनव उपक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्यांविषयी जागरूकता वाढवली. मानवी साखळीतून साकारलेली 'GO VOTE' प्रतिकृती आणि प्रांगणात घुमलेला मतदान जनजागृतीचा संदेश हा नगर परिषदेच्या मोहिमेचा मुख्य आकर्षण ठरला.

"लोकशाहीतील समानतेचे मूल्य अधिक बळकट करूया, चला आत्मविश्वासाने मत देण्याचा निर्धार करूया!" या घोषणेसह कार्यक्रमाची सांगता झाली आणि शहरात सकारात्मक वातावरण निर्माण झाले.

धन्वंतरी हॉस्पिटल
अंबड चौफुली, गायत्री लॉन जवळ, सोरटी नगर, जालना. Mob.: 9421644919 / 7620649157


मुळव्याध, भगंदर, फिशर
संडासाच्या जागी आग होणे, ठणक लागणे
रक्त पडणे, केसतोड होणे, पू रक्त येणे इ.त्रास
उपचार
✲ इंजेक्शन थेरपी ✲ क्षारसुत्र थेरपी ✲ ऑपरेशन ✲ दररोज मलमपट्टीची गरज नाही ✲ एकदा ऑपरेशन करा मुळव्याध पासून मुक्ती अनुभवा
डॉ. योगेशसिंह कच्छवाह (राजपुत) M.D. Ayu. डॉ. नयना यो. कच्छवाह (राजपुत) B.A.M.S.
आयुर्वेदीक पंचकर्म उपचार
✲ सांधेवात
✲ कंबर दुखी
✲ आम्लपित्त
✲ त्वचारोग
✲ ॲलर्जी, दमा
✲ मानदुखी
✲ मणक्यातील गॅप
✲ संपूर्ण पंचकर्म इ. सर्व रोग
✲ मानसिक विकार
✲ वजन वाढवणे
✲ स्त्रियांचे आजार
✲ मुतखडा
✲ जुनाट सर्दी
✲ दारू सोडवणे